

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in मंगळवार दिनांक 26/08/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 191 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# पक्षाची ध्येय धोरणे घराघरापर्यंत पोचवा - आ. सुनील शेळके

## तर..स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत एकहाती सत्ता !

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मावळ : आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या मावळ तालुक्यातील सर्व पदाधिकाऱ्यांच्या कामाचा आढावा घेत पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी तालुक्यात सुरू असलेली विकासकामे आणि पक्षाची ध्येय धोरणे घराघरापर्यंत पोचवा, असे आवाहन आमदार सुनील शेळके यांनी केले.**




वडगाव मावळ येथे शासकीय विश्रामगृहाचे आवारात झालेल्या मावळ तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ता मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी तालुकाध्यक्ष गणेश खांडगे, ज्येष्ठ नेते गणेशअप्पा ढोरे, विठ्ठलराव शिंदे, काळूराम मालपोटे, लक्ष्मणराव बालगुडे, भरत येवले, नारायण पाळेकर, दीपक हुलावळे, नारायण ठाकर, पंढरीनाथ ढोरे, शहराध्यक्ष सुरेश धोत्रे, प्रवीण झेंडे, रवी पोटफोडे, प्रवीण ढोरे, युवकचे तालुकाध्यक्ष किशोर सातकर, महिला आघाडीच्या तालुकाध्यक्ष सुवर्णा राऊत, कार्याध्यक्षा कल्याणी काजळे, ग्रामीण ब्लॉक अध्यक्ष वर्षा नवघणे, शहराध्यक्ष शैलजा काळोखे, पद्मावती ढोरे, युवतीच्या तालुकाध्यक्ष तेजस्विनी गरुड, सहकारसेलचे तालुकाध्यक्ष दिलीप ढोरे, अल्पसंख्यांक महिला सेल अध्यक्षा शबनम खान, विद्यार्थी सेल अध्यक्ष सुशांत बालगुडे आदींसह सर्व सेलचे अध्यक्ष, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार सुनील शेळके यांनी याप्रसंगी पक्षाचे तालुका कार्यकारिणी तसेच सर्व सेलचे पदाधिकारी, विभाग अध्यक्ष, शहराध्यक्ष, कार्याध्यक्ष यांच्याकडून पक्षाच्या कामाचा आढावा ऐकून घेतला.

प्रत्येक पदाधिकाऱ्याने जबाबदारीने पक्षाचे काम केले पाहिजे, ज्यांना काम न करता पदे अडवून ठेवायची आहेत त्यांनी स्वतःहून थांबावे अशी सूचनाही केली.

सहकार विभाग, शासकीय कमिटी आदी ठिकाणी संधी दिल्या त्या कार्यकर्त्यांनी पक्षाचे काम निष्ठेने केले पाहिजे, पदे दिली आणि काम मात्र करत नाही असे चालणार नाही अशी ताकीदही दिली.

### विरोधकांवर हल्लाबोल !

यावेळी बोलताना आमदार सुनील शेळके यांनी विरोधकांवरही निशाणा साधला, तळेगाव दाभाडे नगरपरिषद साठी नगराध्यक्ष पदाचा उमेदवार म्हणून मी भाजपच्या कार्यकर्त्यांचे नाव घेतले तर विरोधकांनी राष्ट्रवादीकडे उमेदवार नाही म्हणून मी भाजपच्या कार्यकर्त्यांचे नाव घेतले असा आरोप केला.

विरोधकांनी नाव जाहीर करावे आणि पुन्हा एकदा आजमावून बघावे असे थेट आव्हान विरोधकांना केले.

यावेळी बोलताना आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुतीच्या माध्यमातूनच लढण्याचा पुनरुच्चार करत ही महायुती विधानसभा निवडणुकीप्रमाणे असेल असेही सांगितले व अशा पद्धतीने एकत्र लढलो तर जिल्हापरिषद, पंचायत समिती, लोणावळा, तळेगाव दाभाडे नगरपरिषद, वडगाव नगरपंचायत निवडणुकीत एकहाती सत्ता येईल असा ठाम विश्वास व्यक्त करत विजयी उमेदवारांची संख्याही जाहीर केले.





# पिंपरी चिंचवड विद्यापीठात नवीन शैक्षणिक वर्षानिमित्त 'दीक्षारंभ' समारंभ

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी - आयटी अभियांत्रिकीचा विकास झपाट्याने होत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, चॅट बॉट, चॅट जीपीटी हे शब्द परवलीचे झाले असून तीन चार वर्षांत तंत्रज्ञान बदलत आहे. याचा विचार करून आपली कौशल्ये आत्मसात केली पाहिजेत. तरच भविष्यातील आव्हानांचा यशस्वीपणे सामोरे जाऊन यश संपादन करता येईल, असे मार्गदर्शन सोगिती कॅपजेमिनीच्या वरिष्ठ संचालक कांचन भोंडे यांनी विद्यार्थ्यांना केले.**



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट पीसीईटी संचालित पिंपरी चिंचवड विद्यापीठ, साते मावळ येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांसाठी 'दीक्षारंभ' समारंभाचे आयोजन सोमवारी (२५ ऑगस्ट) करण्यात आले होते. यावेळी पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, धनंजय काळभोर, प्रभारी कुलगुरू डॉ. गोविंद कुलकर्णी, प्र-कुलगुरू डॉ. सुदीप थेपडे, स्कूल ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे विभाग प्रमुख डॉ. रामदास बिरादार, अभियांत्रिकी विभाग अधिष्ठाता डॉ. विजय पाटील आदी उपस्थित होते.उच्च शिक्षण घेताना स्वयं शिक्षणावर भर दिला पाहिजे. जोपर्यंत तुम्ही स्वयं प्रेरणेने अभ्यास करत नाहीत; तोपर्यंत ज्ञानाच्या कक्षा रुंदावणार नाहीत; हे विद्यार्थ्यांनी लक्षात घेतले पाहिजे. पालकांनी देखील या बाबी विचारात घेतल्या पाहिजेत, असे भोंडे यांनी सांगितले.पीसीईटी शैक्षणिक समुहातील सर्व संस्था, पिंपरी चिंचवड विद्यापीठ विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्य घडविण्याचे कार्य तीस - पस्तीस वर्षांपासून करत आहे. शिक्षक, प्राध्यापकांच्या योगदानामुळे संस्थेने ही प्रगती केली असून आंतरराष्ट्रीय पातळीवर पीसीईटीने दर्जेदार शिक्षण देणारी संस्था म्हणून नावलौकिक प्राप्त केला आहे. विद्यार्थ्यांनी काटेकोर शिस्तीचे पालन करत मन लावून अभ्यास करावा. अभ्यासक्रमा सोबतच मानसिक, शारीरिक तंदुरुस्तीवर भर दिला पाहिजे. यासाठी विद्यापीठात क्रीडा विभाग कार्यरत असून विद्यार्थ्यांनी येथील सुविधांचा लाभ घेतला पाहिजे. पालकांनी पाल्याच्या प्रगतीबाबत प्राध्यापकांशी नियमित संवाद साधला पाहिजे, असे हर्षवर्धन पाटील म्हणाले.डॉ. गोविंद कुलकर्णी, डॉ. सुदीप थेपडे, डॉ. रामदास बिरादार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.यावेळी प्रथम वर्ष अभियांत्रिकी मधील विशेष प्राविण्य मिळवलेले विद्यार्थी पार्थ पेटकर, दिव्यांश गांगुर्डे, रिद्धीमा सिन्हा, स्वराली संते, हर्षदा गोथे, मानव जोशी, काशवी श्रीवास्तव, वैष्णवी खंडेलवाल यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. कार्यक्रमास विविध विद्या शाखेचे अधिष्ठाता, प्राध्यापक, विद्यार्थी, पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शितल विसपूते यांनी केले. आभार रितू दुधमल यांनी मानले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# जनसंवाद सभेत नागरिकांच्या 77 तक्रार वजा सूचना प्राप्त

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पिंपरी : महापालिकेच्या वतीने पार पडलेल्या जनसंवाद सभेत एकूण ७७ तक्रार वजा सूचना प्राप्त झाल्या आहे. आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या आदेशानुसार पिंपरी चिंचवड शहरातील नागरिक आणि महापालिका प्रशासन यांच्यात सुसंवाद राखण्यासाठी महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांत महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या सोमवारी जनसंवाद सभेचे आयोजन करण्यात येते

त्यानुषंगाने आज ऑगस्ट महिन्याच्या चौथ्या सोमवारी अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह या आठ क्षेत्रीय कार्यालयात आज जनसंवाद सभा पार पडली. यावेळी नेमून दिलेल्या समन्वय अधिकाऱ्यांनी जनसंवाद सभेचे अध्यक्षपद भूषविले.आज पार पडलेल्या जनसंवाद सभेत अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह या क्षेत्रीय कार्यालयात अनुक्रमे ३, १२, १२, १२ , ६, १३ , २ आणि १७ अशा एकूण ७७ तक्रारी वजा सूचना नागरिकांनी उपस्थित राहून मांडल्या.

यावेळी नागरिकांनी शहरातील शहरातील महत्वाच्या रस्त्यांवर उड्डाणपूल बांधावेत, वाहतुकीच्या समस्या, महिलांच्या शौचालयांची दुरावस्था, गणपती मंडळ परवानगी साठी लागणारा विलंब, गणेशोत्सव काळात वाहतुकीचे नियोजन, शहरातील खड्डयांची डागडुजी करणे, भाजीपाला मार्केटसाठी प्रशस्त जागा, गणपती काळात मिरवणूक मार्गावरील अतिक्रमण हटविणे आदी तक्रार वजा सूचना जनसंवाद सभेत नागरिकांनी उपस्थित राहून मांडल्या.

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे

## - आयुक्त शेखर सिंह

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी : यंदा गणेशोत्सव हा राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२५ या कालावधीत हा उत्सव साजरा होत असून, या अनुषंगाने शहरातील मुख्य मिरवणूक मार्ग, विसर्जन घाट तसेच इतर ठिकाणी वाहतूक व्यवस्था, स्वच्छता, सुरक्षा यांसह आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याच्या दृष्टीने सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिले. महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी पोलीस यंत्रणेशी समन्वय साधून उत्सव मूर्तींचे विसर्जन करण्यात येणाऱ्या घाटांवर योग्य नियोजन करावे, असेही आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले.

आगामी गणेशोत्सव व गणेशमूर्ती विसर्जन अनुषंगाने पिंपरी चिंचवड महापालिका, पोलीस प्रशासन, महावितरण आदी विभागांची आढावा बैठक आयुक्त शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झाली. महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात झालेल्या या बैठकीला सह पोलीस आयुक्त शशिकांत महावरकर, सहाय्यक पोलीस आयुक्त प्रवीण मोरे, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, शहर अभियंता मकरंद निकम, सह आयुक्त मनोज लोणकर, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, सह शहर अभियंता बापू गायकवाड, देवन्ना गट्टूवार, उपायुक्त अण्णा बोदडे, संदीप खोत, सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे, किरणकुमार मोरे, क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घार्गे, अश्विनी गायकवाड, अजिंक्य येळे, अमित पंडित, तानाजी नरळे, किशोर ननवरे, पूजा दुधनाळे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, विशेष अधिकारी किरण गायकवाड, मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे यांच्यासह पोलीस निरीक्षक अमित डोळस, महावितरणचे कार्यकारी अधिकारी अतुल देवकर, सोमनाथ मुंडे यांच्यासह महापालिका, पोलीस प्रशासन आणि महावितरणचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

आयुक्त शेखर सिंह म्हणाले की, 'गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी येथील मुख्य विसर्जन मार्गासह विसर्जन घाट मार्गावरील खड्डे बुजवण्यास प्राधान्य द्या. या मार्गावरील धोकादायक सर्व्हिस वायर, केबल शिफ्ट करण्यासह विद्युत विषयक आवश्यक कामे करण्यात यावीत. विसर्जन घाटावर आवश्यक तेवढे कृत्रिम विसर्जन हौद तयार करा. पीओपी उत्सवमूर्ती व शाडू मातीच्या मूर्तींच्या विसर्जनाची वेगळी व्यवस्था करा. स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून सर्व घाटांवर गणेशमूर्ती संकलनाचे व्यवस्थापन करा. विसर्जन केलेल्या उत्सव मूर्ती घेऊन जाण्यासाठी वाहनांचे योग्य नियोजन करा, तेथे आवश्यक तेवढे मनुष्यबळ उपलब्ध करून द्या. सर्व घाटांवर आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी जीवरक्षकांसह जलद प्रतिसाद पथके तैनात करावीत, अग्निशमन जवान आणि आपदा मित्र यांची नियुक्ती करावी, असे निर्देश आयुक्त सिंह यांनी दिले.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आठ प्रभागांतील गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर करण्यात आलेल्या तयारीचा आयुक्त शेखर सिंह यांनी यावेळी आढावा घेतला. त्यानंतर आयुक्त सिंह म्हणाले, 'गणेशमूर्ती विसर्जनाच्या सर्व ठिकाणी सक्षम वैद्यकीय पथकासह सुसज्ज रुग्णवाहिकेची व्यवस्था करण्यात यावी, मिरवणूक मार्गावर तसेच विसर्जन घाटांवर पुरेशी विद्युत व्यवस्था करावी, गणेशोत्सव कालावधीत संपूर्ण शहरात स्वच्छतेची विशेष मोहीम राबवावी, स्थानिक पातळीवर सेवाभावी संस्था व गणेश मंडळे यांच्याशी समन्वय ठेवावा, विसर्जन तसेच मिरवणूक मार्गावरील धोकादायक व अडथळा ठरणाऱ्या झाडांच्या फांद्यांची छाटणी करावी, विसर्जनाच्या ठिकाणी मिरवणूक संपेपर्यंत स्वच्छ पिण्याच्या पाण्याच्या टँकरची व्यवस्था करावी, मिरवणूक मार्गावर आणि शहरातील गर्दीच्या ठिकाणी मोकाट जनावरे फिरणार नाहीत यासाठी पथकांची नियुक्ती करून कार्यवाही करावी,' असे निर्देशही आयुक्त सिंह यांनी दिले.

यावेळी पोलीस प्रशासनाच्या वतीने करण्यात आलेल्या तयारीची माहिती सह पोलीस आयुक्त शशिकांत महावरकर यांनी दिली. महापालिकेचे उपायुक्त अण्णा बोदडे यांनी गणेशोत्सवाच्या अनुषंगाने महापालिकेने केलेल्या तयारीचे सादरीकरण केले.

# 'कढीपत्ता'मध्ये रिद्धी कुमार बनली भूषण पाटीलची नायिका

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पहिले पोस्टर प्रदर्शित झाल्यापासून सिनेसृष्टीपासून रसिकांपर्यंत सगळीकडेच 'कढीपत्ता' या आगामी मराठी चित्रपटाची जोरदार चर्चा रंगू लागली आहे. प्रसारमाध्यमांमध्ये आलेल्या बातम्यांमुळे 'कढीपत्ता' चित्रपटाची नायिका कोण? या चर्चेला जणू उधाण आले आहे. रसिकांची उत्सुकता शिगेला पोहोचली असताना या चित्रपटातील नवीन पोस्टर प्रदर्शित करण्यात आले आहे. या पोस्टरमध्ये 'कढीपत्ता'मधील नायिकेचा चेहरा रिव्हील करण्यात आला आहे. ७ नोव्हेंबरला हा चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. युवान प्रोडक्शनची प्रस्तुती असलेल्या 'कढीपत्ता' चित्रपटाची निर्मिती स्वप्नील युवराज मराठे यांनी केली आहे. 'कढीपत्ता'ची कथा विश्वा यांनी लिहिली असून दिग्दर्शनही त्यांनीच केले आहे. निर्माते स्वप्नील युवराज मराठे आणि दिग्दर्शक विश्वा यांचा हा पहिलाच चित्रपट आहे. पदार्पणातच एक अनोखी प्रेमकथा रसिकांसमोर आणण्याचे आव्हान विश्वायांनी स्वीकारले. नायिकेचा चेहरा न दाखवणारे पहिले पोस्टर सगळीकडे चर्चेचा विषय ठरले. दुसऱ्या पोस्टरमध्ये नायिकेचा चेहरा रिव्हील करण्यात आला आहे. या चित्रपटात मुख्य भूमिकेत भूषण पाटील असल्याचे पहिल्या पोस्टरमध्ये पाहायला मिळाले. भूषणच्या जोडीला रिद्धी कुमार मुख्य भूमिकेत आहे. प्रेक्षकांना भूषण आणि रिद्धी च्या रूपात एक नवी फ्रेश जोडी पाहायला मिळणार आहे, त्यामुळे एका नवीन जोडीची केमिस्ट्री या चित्रपटाचा युएसपी ठरणार आहे. पोस्टरमध्ये भूषण आणि रिद्धी यांनी प्रेमीयुगुलाप्रमाणे एकमेकांचा हात हाती धरलेला आहे. दोघांच्याही चेहऱ्यावर लोभासवाणे हास्य पाहायला मिळते. रिद्धी कुमारने यापूर्वी काही वेबसिरीज आणि दाक्षिणात्य चित्रपटांमध्ये अभिनय केला आहे. प्रभासच्या आगामी 'द राजासाब'मध्येही ती झळकणार आहे. याखेरीज प्रभासच्याच 'राधे श्याम' या चित्रपटांमध्येही तिने अभिनय केला आहे. रिद्धी कुमारचा हा पहिलाच मराठी चित्रपट आहे. पहिल्याच चित्रपटात उत्कंठावर्धक कथानक असलेल्या 'कढीपत्ता'मध्ये काम करण्याची संधी मिळाल्याने खूप आनंदी असल्याची भावना रिद्धी कुमारने व्यक्त केली आहे. ती म्हणाली की, मराठी चित्रपटांमध्ये नेहमीच गोष्टीला प्राधान्य देण्यात येते. दिग्दर्शक विश्वा यांचे व्हीजन क्लीअर होते, तर निर्माता म्हणून चित्रपटासाठी जे जे आवश्यक आहे ते ते देण्यासाठी स्वप्नील मराठे तत्पर असायचे. त्यामुळेच एक दर्जेदार कलाकृती 'कढीपत्ता'च्या रूपात प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याचेही रिद्धी कुमार म्हणाली. भूषण पाटील आणि रिद्धी कुमार या नव्या कोऱ्या जोडीसोबत 'कढीपत्ता'मध्ये संजय मोने, शुभांगी गोखले, अक्षय टंकसाळे, गार्गी फुले, गौरी सुखटणकर, सानिका काशीकर, निशा माने आदी कलाकार सहायक भूमिकांमध्ये, तर आनंद इंगळे, आनंदा कारेकर आणि चेतना भट पाहुण्या कलाकारांच्या भूमिकेत आहेत.

मंदार चोळकर, मुकुंद भालेराव, विनू सांगवान यांनी लिहिलेल्या गीतांना संगीतकार पद्मनाभ गायकवाड आणि आशिष खांडल यांनी रोहित राऊत, पद्मनाभ गायकवाड, अनन्या वाडकर, साज भट्ट, प्रियांशी श्रीवास्तवा यांच्या आवाजात स्वरसाज चढवला आहे. छायांकन अनिकेत खंडागळे यांनी केले असून वितरणाची जबाबदारी सिनेपोलीस सांभाळणार आहे. विशाल चव्हाण या चित्रपटाचे कार्यकारी निर्माते असून, संयुक्ता सुभाष प्रोजेक्ट हेड आहेत. पार्श्वसंगीत तन्मय भिडे यांनी, तर संकलन ऋषीराज जोशी यांनी केले आहे. रंगभूषा किरण सावंत यांनी केली असून, वेशभूषा पल्लवी पाटील आणि गार्गी पाटील यांनी केली आहे.

# शहरात ज्येष्ठ साहित्यिकांचा 'अण्णा भाऊ साठे' सन्मानाने गौरव

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पिंपरी : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीचे औचित्य साधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि कलारंग सांस्कृतिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, २४ ऑगस्ट रोजी चिंचवड येथील रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात 'द फोक परंपरा' या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्राच्या लोककलेचा आणि सामाजिक चळवळीचा मानबिंदू असलेल्या लोकशाहीरांच्या कार्याला वंदन करण्यासाठी आयोजित या सोहळ्याला खासदार श्रीरंग बारणे, आमदार आश्विनी जगताप, आमदार उमा खापरे, आणि भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्यासह अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पिंपरी-चिंचवड शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर आणि आण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष बाळासाहेब रसाळ, अनिल सौंदळे यांच्याशिवाय शहरातील विविध राजकीय, सामाजिक व औद्योगिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी निमंत्रक म्हणून आमदार अमित गोरखे यांनी, सर्वप्रथम साता समुद्र पार छत्रपती शिवाजी महाराजांना पोहोचवण्याचे काम साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या पोवाड्यातून रशिया येथे केले, तसेच हा कार्यक्रम समाजात जागृती निर्माण करण्यासाठी आणि अण्णा भाऊ साठे यांचे कार्य समाजामध्ये रुजवण्यासाठी यापुढे दरवर्षी आयोजित करण्यात येईल, असे सांगितले. तसेच खासदार श्रीरंग बारणे यांनी सांगितले की, अण्णा भाऊ साठे यांना 'भारतरत्न' मिळवून देण्यासाठी लोकसभेत सर्वात आधी त्यांनी आवाज उठवला होता, आणि पुढील काळातही यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार आहेत. याशिवाय बार्टीच्या अधिकारी इंदिरा अस्वारे यांनी यांनी सांगितले की, आण्णा भाऊ साठे यांचे विचार त्यांचे कार्य समाजातील तळागाळा पर्यंत पोहचवण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित केला आहे.

आपल्या भाषणांतून प्रमुख पाहुण्यांनी अण्णा भाऊ साठे यांच्या क्रांतिकारी जीवनकार्यावर, त्यांच्या साहित्यातील उपेक्षित समाजाच्या वेदनांवर आणि 'जग बदल घालूनी घाव' या त्यांच्या सामाजिक परिवर्तनाच्या संदेशावर भाष्य केले. या सोहळ्याचा मुख्य उद्देश लोकसाहित्य आणि लोककलांच्या समृद्ध परंपरेचे जतन करणाऱ्या कलाकारांचा गौरव करणे हा होता. याप्रसंगी साहित्य आणि कला क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या तुकाराम पाटील, राज अहिरराव, तानाजी एकोंडे, धनंजय भिसे आणि सौ. शामला पंडित या मान्यवरांना त्यांच्या अतुलनीय योगदानाबद्दल सन्मानचिन्ह आणि रोख रक्कम 5000 प्रत्येकी देऊन गौरविण्यात आले. याव्यतिरिक्त, महानगरपालिकेच्या शाळेत शिक्षण घेणारी आणि जर्मनीतील प्रतिष्ठित युनायटेड वर्ल्ड कॉलेजमध्ये (UWC) उच्चशिक्षणासाठी निवड झालेली विद्यार्थिनी श्रावणी टोनगे हिचा देखील विशेष सत्कार करण्यात आला,11 हजार रु रोख व स्मृती चिन्ह देण्यात आले,ज्यामुळे पिंपरी-चिंचवड शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला.

पुरस्कार वितरणानंतर सादर झालेल्या लोककलांच्या फोक परंपरा ह्या अप्रतिम सादरीकरणामुळे प्रेक्षागृहातील वातावरण उत्साहाने भारून गेले होते. हा कार्यक्रम केवळ एका जयंतीचा सोहळा नसून, लोकशाहीरांच्या कार्याचा आणि विचारांचा सन्मान करून, लोककला व लोकसाहित्य ही समृद्ध परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याची एक चळवळ होती, ज्यामुळे सामाजिक समता आणि एकतेचा संदेश देण्यात आला. या कार्यक्रमाला विविध क्षेत्रांतील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

त्यामध्ये प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे ,राजेश पिल्ले,नगरसेविका अनुराधा गोरखे,राजू दुर्गे,शर्मिला बाबर,कमल घोलप,वैशाली काळभोर, भाजपा महिला उपाध्यक्षा सुप्रिया चांदगुडे, तसेच नगरसेवक शीतल शिंदे, सुजाता पालांडे, जयश्री गावडे आणि नगरसेवक राजेंद्र बाबर, संदीप वाघेरे,अमित गावडे, संदीपान झोंबाडे,तसेच बापू घोलप, कैलास कुटे, नेताजी शिंदे,राजेश अडसूळ, यांचा समावेश होता.

तसेच भाजपा उद्योग आघाडी अध्यक्ष अतुल इनामदार, स्वीकृत नगरसेवक संजय कणसे, तसेच गणेश वाळुंजकर, बाळासाहेब शिंदे, दत्ता देवतरासे, काळुराम पवार आणि गणेश लंगोटे ,मनिषा शिंदे,मनोज तोरडमल,भाऊसाहेब अडगळ,आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संदीप वाघेरे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी नगरसेवक संदीप वाघेरे यांच्या वाढदिवसानिमित्त यावर्षीही विविध समाजोपयोगी उपक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. सामाजिक भान जपत दरवर्षीप्रमाणे याही वर्षी २७ ते ३० ऑगस्ट दरम्यान विविध आरोग्य व जनहिताच्या कार्यक्रमांची आखणी करण्यात आली आहे.याविषयी अधिक माहिती देताना वाघेरे म्हणाले कि, समाजाने मला दिलेल्या प्रेम व विश्वासाबद्दल मी सदैव ऋणी आहे.

माझ्या वाढदिवसानिमित्त जनतेच्या हितासाठी उपयुक्त उपक्रम राबवावेत, हा माझा नेहमीच आग्रह असतो. आरोग्य शिबिर, रक्तदान व पर्यावरणपूरक उपक्रमांच्या माध्यमातून समाजसेवा करण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे. अधिकाधिक गरजू नागरिकांनी याचा लाभ घ्यावा.

२७ ऑगस्ट रोजी गणेश मूर्ती विसर्जन व संकलन केंद्र उभारण्यात येणार असून, पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचा संदेश या माध्यमातून देण्यात येत आहे. यानंतर २८ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. रक्ताचा तुटवडा लक्षात घेता हे शिबिर अत्यंत उपयुक्त ठरणार आहे तसेच २९ व ३० ऑगस्ट रोजी सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत मोफत आरोग्य व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.या शिबिरामध्ये लोकमान्य हॉस्पिटल, चिंचवड, तळेगाव ओंको लाईफ हॉस्पिटल, साने गुरुजी हॉस्पिटल, हडपसर, कै. शंकरराव मासुळकर नेत्र रुग्णालय, अजमेरा साई दीप ENT रुग्णालय, पिंपळे सौदागर, स्पर्श हॉस्पिटल, सोमाटणेरुबी अलकेअर, वाय.सी.एम. रुग्णालय पतपेढी व इतर रुग्णालये नामांकित रुग्णालयांचा सहभाग असणार आहेगरीब व गरजू नागरिकांना मोफत उपचारांची सुविधा देत आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांना कोणतेही शुल्क न देता वैद्यकीय तपासणी व आवश्यक शस्त्रक्रिया तसेच विविध आजारांचे वेळेत निदान होऊन योग्य उपचार मिळाल्यामुळे गंभीर आजार टाळता येणार आहेत,नागरिकांमध्ये शिबिराद्वारे नागरिकांमध्ये स्वच्छता, पोषण, नियमित तपासणी याबाबत जागरूकता वाढविणे शक्य होणार आहे तसेच शिबिरात विविध क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध असल्याने उच्च दर्जाची वैद्यकीय सेवा मिळणार असून कॅन्सर,केमोथेरपी,रेडीएशन, हृदय, डोळे, हाडे, स्त्रीरोग, इत्यादींच्या शस्त्रक्रिया मोफत केल्या जाणार आहेत.

ज्याचा खर्च सामान्य नागरिक करू शकत नाहीत तसेच अशा उपक्रमांमुळे सामाजिक बांधिलकी वाढते आणि नागरिकांमध्ये सकारात्मक भावना निर्माण होते. अधिकाधिक गरजू नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन वाघेरे यांनी केले आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 9657409579